# राशिभविष्य - डिसेंबर, २०१७.

**दादा दामले (dadadamle@gmail. com )**

========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागते. त्यामुळे त्यांनी सतत मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून व तोंडाला कुलूप लावून या महिन्याचा काळ व्यतीत करावा. तेच सुखाचे होईल. कारण गुरु-शुक्रासारख्या शुभ ग्रहांची थोडी फार अनुकुलता असल्यामुळे मधून मधून ज्या काही मनोनुकुल घटना घडतील त्यांचे सुखसमाधान अनुभवू शकाल. सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय चंचल, अस्थिर, लहरी असा झाला असावा, असे वाटते. तसे खरोखरच असेल तर त्यामुळे कोणी चार उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या, तर स्वभाववैचित्र्यामुळे अपमान झाल्यासारखे वाटून आपल्याकडून समजुतीच्या चार गोष्टी सांगणाराचा न कळत अपमान होण्याची दाट शक्यता आहे. जपा. तसे घडू नये यास्तव तोंडाला कुलूप लावून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. कौटुंबिक त्रास, गैरसमज, वाद , मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. तसेच जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील गैरसमज, वाद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. पण गुरु ग्रहामुळे परिस्थिती आटोक्यात राहील. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशयाने वा गैरसमजाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने विवाहेच्छूचे विवाह ठरण्याची शक्यता दिसते. ज्यांचे प्रेमसंबंध जुळून आले आहेत ते अधिक दृढ होतील. काहींना नवे मित्र मिळतील. ज्या गर्भवती स्त्रियांचा या महिन्यात प्रसूतिकाळ आहे त्यांना पुत्रप्राप्ती होणे संभवते. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना मात्र नोकरीत प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. कुमार्गी मित्रांपासून दूर राहा. नवीन काही करण्याच्या भानगडीत पडू नका. श्रद्धेने श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा” स्तोत्राचे पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात सतत सावधानतेने व विचारपूर्वक आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. खर्चही विचारपूर्वकच करावा. आर्थिक फसवणूक होणार नाही, याची काळजी घ्यावी. नपेक्षा नको त्या वाईट प्रसंगाला सामोरे जावे लागेल. बेअब्रू होणे संभवते. प्रिय, आदरणीय मंडळींशी अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. जपा. राहू ग्रहाच्या अनुकुलतेने हातून कर्तृत्वसंपन्न घटना घडणे संभवते. पण हाच राहू बंधुसुखात बाधा निर्माण करीलसे दिसते. जपा. बौद्धिक, शैक्षणिक, आध्यात्मिक, यांत्रिकतांत्रिक व वैद्यकीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना तसेच मानसोपचार तज्ञाना आणि द्रव पदार्थांचा व्यापार -व्यवसाय असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. पण या राशीच्या काहीजणांकडून ढोंगीपणाचे आचरण होणे संभवते. जपा. काहींना नवीन काही करण्याची उर्मी येईल. पण काळ अनुकुल नसल्याने त्यांनी तसा विचारही करू नये. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे अनारोग्य, अपेक्षाभंग, असमाधानकारक घटना घडणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या नोकरदार मंडळींना प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. तसेच काही मंडळींना मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करीलसे दिसते. जपा. बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल; पण उत्तरार्धात मनस्तापदायक असल्याचा अनुभव येईल. स्वतंत्र व्यापार, व्यवसाय असणारांना

अस्थिर परिस्थितीला सामोरे जावे लागेल. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना करा. त्यामुळे मन खंबीर बनेल. काही मंडळींना शिवोपासनाही अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना कौटुंबिक सुखाचे दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल आहे असेच म्हणावे लागेल. कुटुंबातील सदस्यांत सतत काहीही कारणाने वाद , मतभेद, भांडणे होण्याची शक्यता दिसते. तसेच कौटुंबिक व आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी जीवनसाथीला अपार कष्ट करावे लागण्याची शक्यताही जाणवते. त्यामुळे जीवनसाथीच्या आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. तसे घडले तर काही अविचारी मंडळीना कुसंगतीची बाधा होणेही संभवते. जपा. काही मंडळींना आर्थिक समस्या त्रस्त करतील. अशा परिस्थितीत मनावर व विचारशक्तीवर संयम ठेवून व सहनशील बनून तसेच नम्रतेचे आचरण करून विपरीत काळ व्यतीत करणेच सुखाचे होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेले गुरु-मंगळ ग्रह वैद्यकीय शिक्षण व्यवसायास तसेच यांत्रिकतांत्रिक व्यवसायास अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक असले तरी हा मंगळ विविध कारणांनी संततिविषयक समस्या त्रस्त करीलसे दिसते. मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाची आचरणविषयक समस्या मनस्ताप देण्याची शक्यता दिसते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. अकारण दगदग करू नये. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा काळ अनुकुल असला तरी या राशीच्या काही मंडळीना सुखासीन वृत्तीमुळे, जडत्व आल्यामुळे काळाच्या अनुकूलतेचा लाभ घेणे जमणार नाही. त्यासाठी आळस झटकून जे काय साधावयाचे ते साध्य करण्यासाठी प्रयत्न केलाच पाहिजे. विचाराच्या तंद्रीत वाहन चालवू नका. सतत सावधानतेने आचरण करा. अपघात भय संभवते. या राशीच्या काही मंडळींना रक्तविकार, मुख दंत आजार किंवा त्वचेचे आजार त्रस्त करतील. मित्रांशी वाद, भांडणे टाळा. जपा. श्रद्धा असेल तर आध्यात्मिक उपासनेसाठी काळ अनुकुल असल्यामुळे शिवोपासना केल्यास मन शांत व स्थिर राहू शकेल व सर्व प्रकारचे आरोग्यही फारसे बिघडणार नाही. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडण्याची शक्यताही दिसते. तसेच काहींना परदेशगमनाची संधी मिळणेही संभवते.

**(४) कर्क -** या महिन्याच्या काळात सतत मनाविरुद्ध अपमानास्पद व असमाधानकारक घटना घडत गेल्यास या राशीच्या मंडळींची मनस्थिती अस्वस्थ , बेचैन अवस्थेत राहणे संभवते. गैरसमजाने कुटुंबात वाद, भांडणे होणेही संभवते. त्याचा परिणाम म्हणून शारीरिक अनारोग्य होण्याची शक्यताही दिसते. जपा. काही मंडळींना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; तर काहींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. जपा. काही मंडळींना नात्यातील मंडळीकडूनही मनस्ताप दिला जाणे शक्य आहे. जपा. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक प्रमाणात अनुकुल व लाभदायक होईल. वकिली-सल्लागारी व्यवसाय, उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच कोळसा, लोखंड व्यापार असणारांना महिन्याच्या पूर्वार्धात कारण असो वा नसो असह्य त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत सुधारणा होईल. नोकरी-व्यवसायात अनेक प्रकारचे लाभ होतील. ज्यांची कोर्टविषयक प्रकरणे असतील त्याना ती मिटविण्यात अपयश येणे संभवते. महिन्याच्या उतरार्धात शत्रूराशीत असलेल्या वक्री बुध ग्रहामुळे या राशीच्या मंडळींच्या संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे, अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. उघड्यावरील बाहेरचे पदार्थ

खाऊ नका. विषभय संभवते. तसेच जलभय असल्याने अनोळखी ठिकाणी पाण्यात पोहण्याचा प्रयत्न करू नका. जलप्रवास टाळा. मुत्सद्दी , राजकारणी मंडळीना काही प्रमाणात काळ अनुकुल होईल. आपली राशी ही गुरु ग्रहाची उच्च राशी असल्याने श्रद्धा असेल तर दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याच्या काळात घरीदारी, नोकरीचे ठिकाणी मनस्ताप देणाऱ्या घटनांना सामोरे जावे लागेल. कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. तसेच नोकरीचे ठिकाणी वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. त्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्यावर परिणाम होणे संभवते. विचाराच्या तंद्रीत रस्त्याने चालू नका वा वाहने चालवू नका. अपघात भय आहे. जपा. शिवाय संतति समस्या त्रस्त करील. पण ज्यांचा शेती व्यवसाय आहे त्यांना काळ लाभदायक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. परिस्थिती प्रतिकुल असली तरी मंगळ ग्रहामुळे हिम्मत वाढेल, महत्त्वाकांक्षा वाढेल, प्रवासाचे योग येतील. गुरु ग्रहामुळे या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. आरोग्य सुधारेल. काही भाग्यवंताना प्रसिद्धी मिळणेही संभवते. पण या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यून मुळे व व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना त्यांच्या संशोधन कार्यात प्रगती करणे शक्य होईल. तसेच काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील; तर काही भाग्यवंतांना परदेशगमनाची संधी प्राप्त होईल. पण हाच राहू शत्रूपासून रक्षण करू शकेल. आर्थिक लाभ मिळवून देईल व काहींना परदेशवारीची संधीही प्राप्त करून देईल. मन:शक्ती व विचारशक्ती ढळू दिली नाहीत तर हातून लोककल्याणाचे कार्यही घडू शकेल. आपली राशी ही सविता सूर्यनारायणाची राशी असल्यामुळे गायत्री देवीची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे सूर्योदयाचे वेळी स्नान करून गायत्री मंत्राचे पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. त्यामुळे त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात घरीदारी सतत प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या स्त्री-वर्गाला लागणाऱ्या वस्तूंचा व्यापार असणाऱ्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण वक्री बुधामुळे महिन्याच्या उत्तरार्धात विरोधी परिस्थिती निर्माण होणे संभवते. जपा. शनि-मंगळ हे दोन्ही प्रभावी ग्रह प्रतिकुल असल्यामुळे कुटुंबात गैरसमज, वाद, भांडणे झाल्यास नातेसंबंधात वितुष्ट निर्माण होईल. जपा. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचे विकार बळावतील. डोळे, घसा, दात, दाढा अशापैकी कशाचा तरी आजार त्रस्त करीलसे दिसते. पण धनस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे परिस्थिती अटोक्यात राहील. स्वतंत्र व्यवसाय असणारांना हा गुरु ग्रह अनुकुल व लाभदायक होईल. राहूकेतू प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या मंडळींना संततिविषयक चिंता त्रस्त करीलसे दिसते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होतील. जपा. या राशीच्या काही मंडळींना आपणांस काहीतरी मोठा आजार होणार अशी मनात सतत कल्पना करत राहिल्यामुळे अस्वस्थता येईल. जपा. काहींना आर्थिक फसवणूक झाल्याची रुखरुख लागून

राहील. या राशीच्या सर्वच मंडळींनी घरीदारी सतत सावधानतेने आचरण करावे. वाहन चालवत असता मोबाईलवर बोलत बसू नये. विचाराच्या तंद्रीत रस्त्याने चालू नये. अपघात भय आहे. जपा. जुगार, लॉटरीच्या नादी लागून आर्थिक नुकसान करून घेऊ नये. तसेच या राशीच्या अधिकारी मंडळीना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह कटाक्षाने टाळावाच. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव जिद्दी झाला असल्यास अकारण शारीरिक, मानसिक श्रम, दगदग होणे संभवते. परंतु गुरु ग्रहामुळे अनारोग्य फारसे होणार नाही, असे वाटते. तरीही सहनशील बनून मनातील संताप वाचेने व्यक्त होणार नाही याची काळजी घेतल्यास खूपच सुखाचे होईल. गुरु ग्रह बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक नुकसान होणे संभवते. तसेच काही मंडळीना आर्थिक फसवणूक झाल्याचा अनुभव येणेही संभवते. कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे होणार नाहीत याची काळजी घ्या. काही मंडळींना उष्णताविकाराचा आजार त्रस्त करीलसे दिसते, पण शुक्र ग्रहामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र तर काहींना मनपसंत नोकरी मिळणे संभवते. पण काही तरी कारणाने बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर आध्यात्मिक उपासनेद्वारे होणारी बाधा सुसह्य होईल. सुखस्थानी असलेल्या केतुमुळे घरात कोणाशी पटणार नाही, कसली तरी चिंता त्रस्त करील. जपा. विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरच्या खाद्य पदार्थांचे सेवन करू नका. सप्तम स्थानी असलेल्या हर्षलमुळे जीवनसाथीच्या विक्षिप्त, लहरी आचरणाचा मनस्ताप सहन करावा लागेल. पतिपत्नीत मतभेद, वाद, भांडणे होणे संभवते. जपा. काही मंडळींना कोर्ट प्रकरणाचा मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना काळ अनुकुल व लाभदायक होईल. काहींचा सन्मान होणेही संभवते. श्रद्धेने कुलस्वामीची उपासना करा.

**(८) वृश्चिक -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ प्रतिकुल असल्याची जाणीव ठेवा आणि मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात आरोग्याची काळजी घ्यावी. रवि-बुध प्रतिकुल असून आरोग्यविघातक आहेत. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी विशेष काळजी घ्यावी. मनाविरुद्ध घटना घडतील. त्यांचा असह्य मानसिक त्रास होणे संभवते. आर्थिक चिंता, फसवणूक, नियोजित कार्यात अडथळे येणे अशापैकी घटनांनी शारीरिक आरोग्यही बिघडणे संभवते. विशेष करून डोळ्यांचे आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. धनस्थानी रविसह शनि असल्याने कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. तसेच आर्थिक चिंता त्रस्त करतील. प्रिय जनांच्या स्थलांतरामुळे अस्वस्थ वाटेल. अध्यात्माची मनापासून आवड असल्यास उपासनेद्वारे मनस्थिती शांत राहू शकेल. घरगुती गोष्टींबाबत गैरसमज, घोटाळे होणे संभवते. षष्ठ स्थानी असलेला हर्षल अनारोग्यकारक असून काही मंडळींना मुदतीचा ताप येणे संभवते. काहींना डोकेदुखीचा तर काहींना मेंदू विकार त्रस्त करील. पण हाच हर्षल व्यवसाय स्थानास अनुकुल असून उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक

कार्यात कार्यमग्न असणारांना प्रगती करून यशस्वी होणे सहज शक्य होईल. भाग्यस्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक सुखाबरोबरच संततिसुखातही बाधा येणे संभवते. व्ययस्थानी असलेला मंगळ पूर्ण अशुभ असल्यामुळे काही मंडळींना जुनी दबलेली प्रकरणे पुन्हा उकरली गेल्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. काहींना मानहानी सहन करावी लागेल. अशा परिस्थितीत मंगळासह असलेला गुरु ग्रह अध्यात्मिक उपासनेस अनुकुल असून अशा उपासनेमुळे मन शांत राहील. तसेच तो सामाजिक कार्यासही अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना शांतिसमाधान देईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात स्वत:च्या व जीवनसाथीच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे अगत्याचे होईल. कुटुंबातील काही प्रिय जनांचे स्थलांतर झाल्यामुळे अस्वस्थ व्हाल. त्यामुळे काही मंडळींना नैराश्य येणेही संभवते. मन अस्थिर, चंचल होणे संभवते. याचा परिणाम म्हणून काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह लग्नस्थानी आला की अधिक शारीरिक-मानसिक अनारोग्याचा त्रास होणे संभवते. धनस्थानी असलेल्या केतुमुळे सतत आर्थिक चिंता त्रस्त करील जपा. तृतीय स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे भावनाशील मनस्थिती होणे संभवते. त्यामुळे अध्यात्मात रस असणारांना आध्यात्मिक उपासनेद्वारे मन:शक्ती प्राप्त होईल. हाच नेपच्यून काहींना जलप्रवासाची संधी देईल; तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. शास्त्रीय संशोधन , उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र व गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. या राशीच्या ज्या मंडळींना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य आहे त्यांनी मनावर ताबा ठेवून तो मोह टाळावाच . नपेक्षा सर्वस्व गमावून बसाल. जपा. सामान्य नोकरी-व्यवसाय असणारांना कष्ट-परिश्रम करूनच काही प्रमाणात अपेक्षित अर्थप्राप्ती होईल. लाभस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या विवाहेच्छूचे विवाह ठरतील. पण शुक्राचा अस्त असल्यामुळे विवाहविधी संपन्न करता येणार नाही. काहींना नवे मित्र मिळतील. इच्छा आकांक्षा पूर्ण होण्याची शक्यता दिसते. वाहनसुख मिळेल. महिन्याच्या पूर्वार्धापेक्षा महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल असल्याचा अनुभव येईल. शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** सध्या या राशीच्या मंडळींचे मन अस्वस्थ असल्याचे दिसते. तसे खरोखरच असेल तर त्यांचे घरात कोणाशी पटत नसावे असे वाटते. स्वभाव तक्रारखोर झाला असावा. आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभत नसावे. वास्तव्य असलेल्या वास्तूतही सुख लाभत नसावे. काही काम धंदा न करता ऐषाराम करीत स्वस्थ पडून राहावेसे वाटत असणेही संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असून तो लाभदायक होईल. त्यामुळे जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा. महिन्याच्या उत्तरार्धात विरोधी परिस्थिती निर्माण होणे संभवते. सतत मनाविरुद्ध घटना घडणे, अनारोग्याचा त्रास होणे, अस्वस्थ मनस्थिती होणे, नैराश्य येणे, आकस्मिक खर्च निर्माण होणे अशापैकी घटना महिन्याच्या उत्तरार्धात घडण्याची शक्यता वाटते. वक्री बुधामुळे अपयश, मानहानी सहन करावी

लागण्याची शक्यता दिसते. जपा. व्ययस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे एका पाठोपाठ एक संकटे येणे संभवते. आर्थिक व्यवहार सावधानतेने करा. फसवणूक होणे संभवते. काहींना कोर्ट कचेरीचे लचांड मागे लागणेही शक्य दिसते. त्यात मानहानी होणे संभवते. यामुळे शारीरिक -मानसिक आरोग्य बिघडणेही संभवते. जपा. आर्थिक समस्या त्रस्त करतील. वाहन जपून व सावधानतेने चालवा. अपघात भय आहे. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे कारण असो वा नसो, कुटुंबात भांडणे होणे संभवते. तसेच काहीही कारणाने वैवाहिक जीवनातील सुख समाधान मिळणे अशक्य होईल. जपा. यांत्रिकतांत्रिक नोकरी व्यवसाय असणारांना, शिक्षणक्षेत्रात कार्यरत असणारांना, औषध विक्रेत्यांना , वैद्यकीय व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण केल्यास होणारा मनस्ताप सुसह्य होईल. दररोज श्रद्धेने “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव चंचल, लहरी असा झाला असल्याची शक्यता वाटते. तसेच मनस्थिती अत्यंत कोमल झाली असल्यास मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे असे वाटते. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल होणार असून हा काळ विविध प्रकारे लाभदायक होणे संभवते. मोठ्या लोकांच्या ओळखी होणे , इच्छा आकांक्षा पूर्ण होणे, नियोजित कार्यात यश मिळणे, धनलाभ होणे अशा प्रकारच्या घटना घडतील. काही भाग्यवान मंडळीना कीर्ती , प्रसिद्धी मिळणेही संभवते. पण काही व्यावसायिकांच्या व्यवसायात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि-शुक्र-बुध अनुकुल होतील आणि सर्व काही मनासारखे सुखाचेच होईल. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला गुरु अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना अनुकुल असून उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. तसेच आपल्याजवळ असलेल्या सदगुणांचा विकास करणारी परिस्थिती निर्माण होईल. काहींना त्यातून प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या अधिकारी मंडळींना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह टाळावाच. नपेक्षा विपरीत परिणाम भोगावे लागतील. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक शक्ती देणार आहे. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांनी त्याचा लाभ घ्यावा आणि आपल्या संशोधन कार्यात प्रगती साधावी. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. पण काहीना संततिविषयक समस्या त्रस्त करील. तसेच गृहसौख्यातही काहीही कारणाने बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल. “ओम नम: शिवाय “ मंत्राचा दररोज नियमितपणे एक माळ जप करा.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत हळूवार, कोमल अशी झाली असल्याचे जाणवते. त्यामुळे मानसिक संवेदनाही शीघ्र होत असतील. मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच नैराश्य येत असेल . अशा परिस्थितीत बुद्धी अत्यंत अस्थिर झाली असल्यास अविचाराने खर्च होणे संभवते. जपा. तसेच स्वभाव अस्थिर झाला असल्यास विचित्र आचरण होण्याची शक्यता आहे. जपा. अविचाराने फतकळ बोलून नकळत समोरच्याला अपमानित कराल.

जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. थोरामोठ्यांच्या ओळखी होतील. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. पण महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत मानसिक ताण, विरोध, मानहानी होणे संभवते. जपा. चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र, वकिली व्यवसाय, हिशेब अशापैकी नोकरी-व्यवसाय असेल, दलाली, कमिशन वर व्यवसाय असेल तर महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. प्रवासयोग संभवतो. जन्मकुंडलीत योग असेल तर काहीजणांना अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने धनलाभ होण्याची शक्यता आहे. पण या अनुकुलतेचा उपभोग घेण्यासाठी शारीरिक -मानसिक आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. कारण अष्टम स्थानी असलेला मंगळ अनारोग्यकारक आहे. काहींना उष्णताविकारांचा आजार त्रस्त करील. काहींना शारीरिक-मानसिक कष्ट सहन करावे लागतील. विजेपासून जपा. तसेच पाण्यापासून धोका असल्याने जलप्रवास करू नका. अपघात होणेही संभवते. नियोजित कार्यात अपयश येणे शक्य आहे. जपा. अशा परिस्थितीत शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणांनी बाधा येणे संभवते. या राशीच्या मंडळींच्या संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी
गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====ooo0ooo=====